“मराठा समाजातील अल्पभूधारक शेतक-यांचे सामाजिक व आर्थिक अध्ययन: विशेष संदर्भ नांदेड जिल्हा”

(२००९-१० ते २०१९-२०)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्य विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा पूर्व संशोधन आराखडा

● अभ्यासक ●

आर.डी.जाधव

एम.ए.,बी.एड.,सेट (अर्थशास्त्र)

मु.सोनाळा पो.निमगांव ता.अर्धापूर जि.नांदेड

● मार्गदर्शक ●

प्रा. डॉ. पी.आर. मुठ्ठे

सहयोगी प्राध्यापक आणि विभाग प्रमुख,

पद्व्युत्तर अर्थशास्त्र विभाग आणि संशोधन केंद्र,

यशवंत महाविद्यालय, नांदेड

: संशोधन केंद्र :

पद्व्युत्तर अर्थशास्त्र विभाग,

यशवंत महाविद्यालय,नांदेड

ऑगस्ट २०२१

"मराठा समाजातील अल्पभूधारक शेतक-यांचे सामाजिक व आर्थिक अध्ययन : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा"

(२००९-१० ते २०१९-२०)

गोषवारा :

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून कृषी क्षेत्रास ओळखले जाते. या क्षेत्रात तेजीने उत्पादनात वाढ होत असेल तर अर्थव्यवस्थेत देखील तेजीने बदल होतांना दिसतो. ग्रामीण भागामध्ये उपभोग्य वस्तूंना मोठ्या प्रमाणात मागणी असते. कोणत्याही देशाच्या औद्योगिकीकरणात कृषी क्षेत्र महत्वाची भूमिका बजावत असतो. तसेच भारतीय अर्थव्यवस्थेत देखील कृषी क्षेत्र आपली भूमिका बजावतांना दिसते. मागील बारा पंचवार्षिक योजनेचे अवलोकन केल्यास आपल्या असे लक्षात येइल लोकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ करण्यात कृषी क्षेत्राने महत्वाची भूमिका बजावली आहे. औद्योगिक क्षेत्रास कच्चा माला सोबतच वाढत्या लोकसंख्येला खाद्यान्नाचा पुरवठा कृषी क्षेत्रातूनच पुरवला जातो. व तसेच कृषी क्षेत्र रोजगार निर्मिती व विदेशी चलन देशाला प्राप्त करून देण्यात महत्वाची भूमिका बजावतो. वरील गोष्टींचा विचार केल्यास कृषी क्षेत्राने एकंदरीत भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये महत्वाचे स्थान प्राप्त केले आहे. कृषी क्षेत्र हे भारतातील सर्वात मोठे मुक्त खाजगी क्षेत्र आहे व तसेच सर्वात मोठे असंघटीत क्षेत्र देखील आहे.

१९९१ च्या म्हणजे जागतिकीकरणाच्या अगोदर शेती उत्पादणात दरवर्षी सरासरी ३.३९ टक्क्यानं वाढ होत होती, तर जागतिकीकरणाच्या १९९१ ते २००७ च्या दरम्यान त्या वाढीचा दर हा सरासरी दरवर्षी २.७७ टक्के एवढा घटला म्हणजे शेती उत्पादणाच्या वाढीचा दर जागतिकीकरणानंतर चक्क घटला आहे. २००८ सालापासून २०१८ सालापर्यंत शेतीतली अधोगती सुरूच राहीली. त्यातल्या कित्येक वर्षात शेतीतल्या वाढीचा दर खुपच कमी आणि काही वर्षात तर चक्क ॠणात्मक होता. १९९५ सालापासून आत्तापर्यंत ३.५ लाख शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. याची सरासरी काढली तर दर बारा तासाला एक आत्महत्या आहे.

आपल्या भारतात एकूण २९ राज्यांपैकी महाराष्ट्र हे एक राज्य आहे. महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे, १९६० रोजी झाली. लोकांच्या संघटीतपणामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला एक वेगळा दर्जा प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र हे देशात दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक लोकसंख्या आसलेले राज्य आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार ११.२४ कोटी होती. महाराष्ट्र राज्य भौगोलिकदृष्ट्या देशातील तिसरे मोठे राज्य असून त्याचे क्षेत्रफळ ३.०८ लाख चौरस कि.मी. आहे. महाराष्ट्र राज्याची राजधानी मुंबई ही आहे. ही फक्त अग्रेसर कॉर्पोरेट संस्थांच्या व कंपन्यांच्या मुख्य कार्यालयाचे माहेरघरच नसून आशिया खंडातील सर्वात जुना शेअर बाजार, मुंबई शेअर बाजार हा देखील याच शहरात आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये सहा महसूल विभाग (मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर) असून त्यामध्ये ३६ जिल्ह्यांचा समावेश आहे. यापैकी नांदेड जिल्हा हा औरंगाबाद या महसूल विभागात येत असून २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ३३,६१,२९२ इतकी आहे. यापैकी नागरी लोकसंख्या ९,१३,८९८ म्हणजेच २७.२ टक्के इतकी आहे. तर ग्रामीण लोकसंख्या २४,४७,३९४ म्हणजेच ७२.८१ टक्के इतकी आहे. व ही नागरी लोकसंख्येच्या तुलनेत सर्वाधिक आहे. ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसाय शेती आहे. त्यामुळे शेती हा ग्रामीण भागातील लोकांचा जीवन जगण्याचा अविभाज्य भाग बनला आहे. ग्रामीण भागातील लोकसंख्या जवळपास ७६ टक्के च्या वर शेतीवर अवलंबून आहे. शेतक-यांना या हवामान बदल आणि उपजाऊ जमिनीचा कमी होत जाणारा कस यामुळे नेहमीच आव्हानांना सामोरे जावे लागते. अनियमित पाऊस, साधन सामग्रीचा जास्त खर्च, बाजारभावातील अनिश्चितता इत्यादी समस्यांना सामोरे जाताना शेतकरी वर्ग अगदी हवालदिल झाला आहे. व यामध्ये आणखी एक महत्त्वाची समस्या म्हणजे नेहमी शेतीतील तुकडी करणामुळे जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या प्रमाणात वाढ झाली आहे.

अल्पभूधारक शेतकरी व्याख्या :

१) "दोन हेक्टर पेक्षा कमी जमीन असलेला शेतकरी म्हणजे अल्पभूधारक होय."
२) "अल्पभूधारक म्हणजे आपल्या धारण क्षेत्रात नवीन उत्पादन तंत्र, बी-बियाणे, कीटकनाशके व जलसिंचन यासारख्या बाबींचा योग्य वापर न करता येण्याजोगे लहान जमिनीचे क्षेत्र होय."
३) "अकार्यक्षम धारण क्षेत्रात शेती कसणारा शेतकरी म्हणजे अल्पभूधारक होय."

थोडक्यात ज्या शेतकऱ्यांजवळ कसण्यासाठी कमी जमीन उपलब्ध आहे व त्यामुळे आर्थिक स्थिती उंचावत नाही तो शेतकरी अल्पभूधारक होय.

संशोधन विषयाची निवड :

महाराष्ट्र राज्यामध्ये मराठवाडा प्रदेशातील नांदेड जिल्हा हा ऐतिहासिक ठिकाण व सोबतच शेती व्यवसायातही अग्रेसर जिल्हा आहे. विविध पिकांच्या लागवडीखाली ७ लाख ७३ हजार हेक्टर एवढे क्षेत्र आहे. ८४ टक्के क्षेत्रावर खरीप व १६ टक्के क्षेत्रावर प्रामुख्याने ज्वारी, भात, तूर, मूग, उडीद, भुईमूग, सूर्यफूल, कापूस इत्यादी पिके घेतली जातात. नांदेड जिल्ह्यात बहुतांश लोकसंख्या ही शेती क्षेत्रावर अवलंबून आहे व त्यामध्ये शेतीनिष्ठ म्हणून मराठा समाजाची संख्या राणे समितीच्या अहवालानुसार ३२ टक्के इतकी आहे. हा समाज आपल्या उदरनिर्वाहासाठी शेती व शेतमजुरी वर आधारलेला आहे. मराठा समाजामध्ये बोटावर मोजण्या इतपत श्रीमंत मराठा सोडला तर इतर मराठा समाजाची स्थिती बिकट आहे. एकेकाळचे शहाण्णव कुळी मराठा, देशमुख, जाहागिर, पाटील, जमीनदार, वतनदार इत्यादी पदव्यांनी ओळखल्या जाणाऱ्या मराठा समाजास ह्या पदव्या नाममात्र राहिलेल्या दिसतात. कारण वारसा हक्काने त्यांच्या जमिनीचे विभाजन व तुकडीकरण झाले. जो मराठा शेती कसत होता त्यास कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी असे संबोधले जाऊ लागले. व त्याच्या व्यवसायावरूनच अनेक प्रकार पाडण्यात आले. नैसर्गिक व मानवनिर्मित कारणांमुळे या समाजाची अधोगती होऊन तो

कर्जबाजारी झाला त्यामुळे त्यांच्या जमिनी कमी कमी होत शेतकरी वर्ग हा मोठ्या शेतक-यावरून अल्पभूधारक व सीमांत आणि काही शेतकरी भूमिहीन झाले. व ते इतरांच्या शेतीत मजुरी करू लागले. मराठा समाजाच्या अल्पभूधारक शेतक-यांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करण्यासाठी त्यांची आर्थिक स्थिती, सामाजिक स्थिती व शैक्षणिक स्थिती कशा प्रकारची आहे हे अभ्यासणे महत्त्वाचे ठरते म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी "**मराठा समाजातील अल्पभूधारक शेतक-यांचे सामाजिक व आर्थिक अध्ययन : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा**" (२००९-१० ते २०१९-२०) हा विषय निवडला आहे.

व तसेच यामध्ये संशोधनाची उद्दिष्टे म्हणून १) मराठा समाजातील शेतकऱ्यांच्या भूधारण रचनेचा (पद्धतीचा) अभ्यास करणे. २) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील शेतकऱ्यांच्या अल्पभूधारकतेच्या कारणांचा आढावा घेणे. ३) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांचे धारणक्षेत्र व जमिनीची उत्पादकता यांचा अभ्यास करणे. ४) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना मिळालेल्या शासकीय योजनांचा अभ्यास करणे. ५) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती अभ्यासणे. ६) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीच्या परिणामाचे अध्ययन करणे. ७) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी उपाय सुचवणे. यांची निवड केली आहे.

संशोधनाची गृहितके १) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजामधील अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या ही मोठी दिसून येते. २) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांचे अवलंबित्व हे शेती व्यवसायावर निर्भर आहे. ३) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची सामाजिक-आर्थिक परीस्थिती ही हलाकीची आहे. ४) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील शेतकऱ्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती मंदगतीने सुधारत आहे.

तथ्य संकलनात गरजे नुसार प्राथमिक व दुय्यम पद्धतीचा वापर करण्यात तेणार आहे. प्रस्तुत विषयाच्या अध्ययनासाठी गैर संभाव्यता नमुना निवड पद्धतीमधील यादृच्छिक नमुना पद्धतीने नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यात मराठा समाजाचे वास्तव्य दिसून येते. प्रत्येक तालुक्याला समान न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून १६०३ गावांपैकी मराठा समाजातील अधिक लोकसंख्या असणाऱ्या व त्यामधील पुरेशा प्रमाणात अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण उपलब्ध असणाऱ्या प्रत्येक तालुक्यातील ५ गावे अशी एकूण ८० गावांची निवड करण्यात येईल. व प्रत्येक गावातून १० मराठा अल्पभूधारक शेतकरी याप्रमाणे ८०० नमुन्याची निवड माहीती संकलनासाठी करण्यात येईल.

अशा प्रकारे वरील साधनांच्या सहाय्याने व वापर करून संशोधन कार्य करण्याचे योजिले आहे.

प्रस्तावना :

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्र हे प्रगतीचे सूचक तसेच संपन्नतेचे प्रतीक समजले जाते. शेती व्यवसाय हा अल्पविकसित देशाचा प्रमुख व्यवसाय समजला जातो व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्रीय उत्पन्नात याच क्षेत्राचा वाटा सर्वाधिक असल्याचे दिसून येते. शेती क्षेत्र हे जीवन जगण्याचे प्रमुख साधन आहे. तसेच औद्योगिक विकास व व्यापाराचा महत्वपूर्ण आधार आहे. शेती क्षेत्रामध्ये इतर क्षेत्राच्या तुलनेत कमी भांडवल गुंतवणूक करावी लागते व या क्षेत्राच्या विकासासाठी विदेशी भांडवलाची आवश्यकता औद्योगिक क्षेत्राच्या तुलनेत कमीच लागते. अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे महत्त्वपूर्ण स्थान आहे तरी उत्पादनापासून ते बाजारातील विक्री पर्यंत या क्षेत्राला समस्यांना सामोरे जावे लागते.

भारतामधील आजही बहुसंख्य लोकांचा व्यवसाय व उत्पन्नाचे साधन हे शेती आहे. तसेच ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसाय देखील शेतीच आहे. शेती क्षेत्राच्या विकासाच्याच आधारे जगातील विकसित राष्ट्र आर्थिक विकासाच्या शिखरावर पोहोचलेले पहावयास मिळते. इंग्लंड, जर्मनी, रुस किंवा जपान या सारख्या देशांमध्ये शेतीचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये जर बघितलं तर शेतीला अत्याधिक महत्व दिलेले आहे. शेती हे आर्य संस्कृतीचे आधारस्तंभ मानले जाते. कोणत्याही देशाने आर्थिक विकास केलेला असला तर त्यास शेती क्षेत्रास डावलून चालणार नाही कारण, शेती क्षेत्र हे मानवाच्या प्राथमिक गरजा अन्न, कच्चामाल, निवारा इत्यादींची पूर्तता करते.

एखाद्या राष्ट्राने किती यश प्राप्त केले असले तरी आपल्या प्राथमिक गरजांपासून वंचित राहू शकत नाही व यांच्या पूर्ततेकरिता अन्य राष्ट्रांवर विसंबून देखील राहू शकत नाही. म्हणून शेती क्षेत्रास प्रत्येक राष्ट्राला अग्रक्रम हा द्यावाच लागतो.

कोल व हूवर यांच्या मते, "संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी शेती क्षेत्राचा विकास अगोदर व्हायला हवा नाही तर एखादे क्षेत्र अविकसित असल्यामुळे दुसऱ्या क्षेत्राच्या आर्थिक विकासात अडचणी येत असतील तर ते अविकसित क्षेत्र शेतीच असणार जे अन्य क्षेत्राच्या विकासात अडचणी निर्माण करत असेल."[१]

किण्डलवर्जर यांनी सहा महत्वपूर्ण घटक सांगितलेले आहेत. ज्यामुळे शेती क्षेत्राच्या विकासातून आर्थिक विकास होण्यास मदत होते.

१) शेती क्षेत्र हे औद्योगिक उत्पादनासाठी कच्च्या मालाचे उत्पादन करते.
२) शेती क्षेत्र हे उद्योग क्षेत्रात रोजगार निर्माण करते.
३) शेती क्षेत्र हे उद्योगात व सरकारमध्ये बचत निर्माण करते.

४) शेती क्षेत्र हे महसूल संकलानासाठी सहाय्यभूत ठरते.

५) शेती क्षेत्रातील उत्पादणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार होतो.

६) शेती क्षेत्र हे मुख्य क्षेत्रास भांडवल व कच्चामाल पुरवठा करते.

विकसित देशांमध्ये राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा इतर क्षेत्राच्या तुलनेत कमीच असतो. याचा अर्थ असा नाही की शेती क्षेत्राचा विकास होत नाही पण. इतर क्षेत्रांच्या तुलनेत शेती क्षेत्राचा विकास कमी होतो. व राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा कमी असणे हे प्रगतीचे लक्षणच समजले जाते. शेती क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचा पाठीचा कणा आहे. गेल्या दोन दशकाहून अधिक काळात औद्योगिकीकरणासाठी जोरदार प्रयत्न करूनही शेती हे अभिमानाचे स्थान राहिले आहे. शेती हा देशातील सर्वात मोठा उद्योग असल्याने देशातील ६५ टक्के लोकसंख्याचे जगण्याचे साधन आहे. राष्ट्रीय सांख्यिकीय संघटनेने दिलेल्या आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की, १९५०-५१ ते १९७०-७१ दरम्यान स्थूल राष्ट्रीय उत्पन्ना मध्ये शेतीचा वाटा ५९ ते ४८ टक्क्याच्या मध्ये होता. वाटा कमी होत होता मात्र आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला गती मिळाली होती. शेतीचा वाटा वेगाने घसरला आणि २०१६-१७ मध्ये तो १३.२ टक्यांपर्यंत खाली आला. भारत हा शेतीप्रधान देश आहे, असं आपण म्हणतो. पूर्वी तर शेती हा अर्थव्यवस्थेचा खूपच महत्त्वाचा आणि उत्पन्नाचा मोठा भाग होता. पण जस-जसे उद्योग वाढले आणि १९८० च्या दशकानंतर सेवा क्षेत्र वाढलं तसतसं शेतीकडे दुर्लक्ष व्हायला लागलं आजही भारतातले ७० टक्के लोक खेड्यात राहतात. आणि त्यामधील ५५ ते ५७ टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. त्यामुळे ख-या अर्थानं आपला देश आजूनही शेती प्रधानच आहे. पण आज शेतीचा आपल्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातला वाटा कमी होत फक्त १५ ते १७ टक्क्यांवर आला आहे.

१९९१ च्या म्हणजे जागतिकीकरणाच्या अगोदर शेती उत्पादणात दरवर्षी सरासरी ३.३९ टक्क्यानं वाढ होत होती, तर जागतिकीकरणाच्या १९९१ ते २००७ च्या दरम्यान त्या वाढीचा दर हा सरासरी दरवर्षी २.७७ टक्के एवढा घटला म्हणजे शेती उत्पादणाच्या वाढीचा दर जागतिकीकरणानंतर चक्क घटला आहे. २००८ सालापासून २०१८ सालापर्यंत शेतीतली अधोगती सुरूच राहीली. त्यातल्या कित्येक वर्षात शेतीतल्या वाढीचा दर खुपच कमी आणि काही वर्षात तर चक्क ऋणात्मक होता. १९९५ सालापासून आत्तापर्यंत ३.५ लाख शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. याची सरासरी काढली तर दर बारा तासाला एक आत्महत्या आहे. तामिळनाडू स्टेट ॲक्शन प्लॅन ऑन क्लायमेट चेंज (TNSAPCCC) यांनी शेती विषयी एक महत्त्वाचं विधान केलं आहे ते म्हणतात.

“शेतीतल्या एक टक्के वृद्धीमुळे जे दारिद्र्य निर्मूलन होतं तेवढं दारिद्र्य निर्मूलन व्हायला इतर क्षेत्रांमध्ये २ ते ३ टक्के वृद्धी व्हावी लागते. असा आत्तापर्यंतचा जागतिक अनुभव आहे.”[२]

आपल्या भारत देशामध्ये एकूण २९ राज्यांपैकी महाराष्ट्र हे एक राज्य आहे. महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे, १९६० रोजी झाली. लोकांच्या संघटितपणामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला एक वेगळा दर्जा प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र हे देशात दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक लोकसंख्या असलेले राज्य आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार ११.२४ कोटी होती. महाराष्ट्र राज्य भौगोलिक दृष्ट्या देशातील तिसरे मोठे राज्य असून त्याचे क्षेत्रफळ ३.०८ लाख चौरस कि.मी. आहे. महाराष्ट्र राज्याची राजधानी मुंबई ही आहे. ही फक्त अग्रेसर कार्पोरेट संस्थांच्या व कंपन्यांचा मुख्य कार्यालयाचे माहेरघरच नसून आशिया खंडातील सर्वात जुना शेअर बाजार, **मुंबई शेअर बाजार** हा देखील याच शहरात आहे.

महाराष्ट्र राज्य ही फक्त भौगोलिक संज्ञा नसून लोकांच्या एकत्रित प्रयत्नातून उभे राहीलेले राज्य आहे. राज्यात विविध चालीरीतींचे व परंपरेचे लोक एकत्रित आनंदाने राहतात. पोवाडा, भारूड, गोंधळ आणि लावणीद्वारे लोककलेमध्ये भरीव योगदानासाठी महाराष्ट्र राज्य ओळखले जाते. महाराष्ट्रातील शेती क्षेत्र हे नेहमीच अर्थव्यवस्थेच्या व सामाजिक व्यवस्थेच्या केंद्रस्थानी आहे. महाराष्ट्र राज्यातील ५० टक्क्यांहून जास्त लोकसंख्या उपजीविकेसाठी शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. सरकारने कोविड-१९ महामारीचा ताळेबंदीच्या काळात शेती क्षेत्रावर कमीत कमी परीणाम व्हावा म्हणून या कठीण काळात शेती क्षेत्राला सूट दिली.

महाराष्ट्र राज्यामध्ये सहा महसूल विभाग (मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर) असून त्यामध्ये ३६ जिल्ह्यांचा समावेश आहे. यापैकी नांदेड जिल्हा हा औरंगाबाद या महसूल विभागात येत असून २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ३३,६१,२९२ इतकी आहे. यापैकी नागरी लोकसंख्या ९,१३,८९८ म्हणजेच २७.२ टक्के इतकी आहे. तर ग्रामीण लोकसंख्या २४,४७,३९४ म्हणजेच ७२.८१ टक्के इतकी आहे. व ही नागरी लोकसंख्येच्या तुलनेत सर्वाधिक आहे. ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसाय शेती आहे. त्यामुळे शेती हा ग्रामीण भागातील लोकांचा जीवन जगण्याचा अविभाज्य भाग बनला आहे. ग्रामीण भागातील लोकसंख्या जवळपास ७६ टक्के च्या वर शेतीवर अवलंबून आहे. शेतक-यांना या हवामान बदल आणि उपजाऊ जमिनीचा कमी होत जाणारा कस यामुळे नेहमीच आव्हानांना सामोरे जावे लागते. अनियमित पाऊस, साधन सामग्रीचा जास्त खर्च, बाजारभावातील अनिश्चितता इत्यादी समस्यांना सामोरे जाताना शेतकरी वर्ग अगदी हवालदिल झाला आहे. व यामध्ये आणखी एक महत्वाची समस्या म्हणजे नेहमी शेतीतील तुकडी करणामुळे जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या प्रमाणात वाढ झाली आहे.

अल्पभूधारक शेतकरी अर्थ व व्याख्या :

देशातील विकास हा कृषी, उद्योग व सेवा क्षेत्रावर अवलंबून असतो. व या क्षेत्रांचा विकास परस्परांवर अवलंबून असतो.

अल्पभूधारक शेतकरी म्हणजे दोन हेक्टरपेक्षा कमी जमिनीचा आकारमान असलेला शेतकरी होय. ज्या शेती धारण क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान, अवजारे, बी-बियाणे इत्यादींचा योग्य वापर करण्याइतपत जमीन नसलेला शेतकरी होय. थोडक्यात कमी शेती असलेला शेतकरी म्हणजे अल्पभूधारक शेतकरी होय. या शेतीच्या धारण क्षेत्रानुसार भूधारकांचे वर्गीकरण सर्वसामान्यपणे अल्पभूधारक शेतकरी, माध्यम शेतकरी व मोठे शेतकरी असे करता येते. भारतामध्ये शेती योग्य जमिनीची उपलब्धता प्रति शेतकऱ्यांसाठी इ.स. १९६०-६१ मध्ये २.३ हेक्टर होती. तर २००२-०३ मध्ये १.४ हेक्टर एवढी होती. तर २०११ मध्ये ती १.० हेक्टर पेक्षा कमी झाली. त्यामुळे शेतीच्या कमी धारण क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान, भांडवल, खते, बी-बियाणे, कीटक-नाशके व जलसिंचनाच्या अपुऱ्या सुविधा यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीस मर्यादा पडतात व शेतकरी आर्थिकदृष्ट्या कमजोर होतो.

अल्पभूधारक शेतकरी व्याख्या :

४) "दोन हेक्टर पेक्षा कमी जमीन असलेला शेतकरी म्हणजे अल्पभूधारक होय."
५) "अल्पभूधारक म्हणजे आपल्या धारण क्षेत्रात नवीन उत्पादन तंत्र, बी-बियाणे, कीटकनाशके व जलसिंचन यासारख्या बाबींचा योग्य वापर न करता येण्याजोगे लहान जमिनीचे क्षेत्र होय."
६) "अकार्यक्षम धारण क्षेत्रात शेती कसणारा शेतकरी म्हणजे अल्पभूधारक होय." थोडक्यात ज्या शेतकऱ्यांजवळ कसण्यासाठी कमी जमीन उपलब्ध आहे व त्यामुळे आर्थिक स्थिती उंचावत नाही तो शेतकरी अल्पभूधारक होय.

संशोधन विषयाची निवड :

महाराष्ट्र राज्य औद्योगिक दृष्ट्या प्रगत राज्य असले, तरी आज अजूनही शेती आणि पूरक उद्योग सुमारे पन्नास टक्के लोकांना रोजगार देतो, हे लक्षात घेता राज्याच्या

सर्वांगीण विकासात शेतीचे स्थान महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र राज्याचा एकूण भूभाग ३७०.५८ लाख हेक्टर आहे. त्यातील शेतजमीन २३२.१२ लाख हेक्टर इतकी आहे. व त्यामध्ये १६८.१५ लाख हेक्टर जमिनीवर पीक घेतले जाते. २०१५-१६ च्या आकडेवारीनुसार यातील ७९.५३ टक्के शेतकरी छोटे व सीमांत आहेत म्हणजे दरडोई दोन एकरपेक्षा कमी जमीन असलेले, तर १५.२२ टक्के शेतकरी अर्ध-मध्यम म्हणजे दोन ते चार एकर जमीन असलेले आणि मध्यम आणि मोठे शेतकरी ५.२५ टक्के इतके आहेत. याचाच अर्थ बहुसंख्य शेतकरी अल्पभूधारक आणि सीमांत श्रेणीत मोडतात, जे मान्सूनवर अधारित शेती करतात व यांच्याकडे सिंचन व्यवस्था मर्यादित आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये मराठवाडा प्रदेशातील नांदेड जिल्हा हा ऐतिहासिक ठिकाण व सोबतच शेती व्यवसायातही अग्रेसर जिल्हा आहे. विविध पिकांच्या लागवडीखाली ७ लाख ७३ हजार हेक्टर एवढे क्षेत्र आहे. ८४ टक्के क्षेत्रावर खरीप व १६ टक्के क्षेत्रावर प्रामुख्याने ज्वारी, भात, तूर, मूग, उडीद, भुईमूग, सूर्यफूल, कापूस इत्यादी पिके घेतली जातात. नांदेड जिल्ह्यात बहुतांश लोकसंख्या ही शेती क्षेत्रावर अवलंबून आहे व त्यामध्ये शेतीनिष्ठ म्हणून मराठा समाजाची संख्या राणे समितीच्या अहवालानुसार ३२ टक्के इतकी आहे. हा समाज आपल्या उदरनिर्वाहासाठी शेती व शेतमजुरी वर आधारलेला आहे. मराठा समाजामध्ये बोटावर मोजण्या इतपत श्रीमंत मराठा सोडला तर इतर मराठा समाजाची स्थिती बिकट आहे. एकेकाळचे शहाण्णव कुळी मराठा, देशमुख, जाहागिर, पाटील, जमीनदार, वतनदार इत्यादी पदव्यांनी ओळखल्या जाणाऱ्या मराठा समाजास ह्या पदव्या नाममात्र राहिलेल्या दिसतात. कारण वारसा हक्काने त्यांच्या जमिनीचे विभाजन व तुकडीकरण झाले. जो मराठा शेती कसत होता त्यास कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी असे संबोधले जाऊ लागले. व त्याच्या व्यवसायावरूनच अनेक प्रकार पाडण्यात आले. नैसर्गिक व मानवनिर्मित कारणांमुळे या समाजाची अधोगती होऊन तो कर्जबाजारी झाला त्यामुळे त्यांच्या जमिनी कमी कमी होत शेतकरी वर्ग हा मोठ्या शेतक-यावरून अल्पभूधारक व सीमांत आणि काही शेतकरी भूमिहीन झाले. व ते इतरांच्या शेतीत मजुरी करू लागले. मराठा समाजाच्या अल्पभूधारक शेतक-यांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करण्यासाठी त्यांची आर्थिक स्थिती, सामाजिक स्थिती व शैक्षणिक स्थिती कशा प्रकारची आहे हे अभ्यासणे महत्त्वाचे ठरते म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी **“मराठा समाजातील अल्पभूधारक शेतक-यांचे सामाजिक व आर्थिक अध्ययन : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा”** हा विषय निवडला आहे.

संशोधन विषयाचे महत्व :

भारत देश हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. भारतातील लोकसंख्या ६० टक्केहूनही अधिक ग्रामीण भागात राहते तर ५५ ते ५७ टक्के लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून आहे. म्हणून तर महात्मा गांधींनी म्हटले होते, ‘खेड्याकडे चला’ अगोदर ग्रामीण भागाचा

विकास केला तरच अखंड भारताचा विकास होईल. स्वातंत्र्योत्तर काळात पहिल्या पंचवार्षिक योजनेची सुरुवात ही शेती क्षेत्राच्या विकासाला अग्रक्रम देऊन शेती हे उपजीविकेचे साधन न ठरवता एक व्यवसाय म्हणून विकसित करण्यावर भर दिला. 'शेती ही देशातील लोकसंख्येचे रक्षण करणारी मोठी शक्ती आहे' हे हावर्ड लुईस यांचे मत येथे बोलके ठरते.[३]

महाराष्ट्र राज्यात शेती व्यवसाय करणारा मराठा समाज संख्येने खूप मोठा आहे. त्यामध्ये मराठवाड्यातील जवळपास ८० टक्के मराठा समाजातील लोकसंख्या ही शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामधील जास्तीत जास्त शेतकरी हे अल्पभूधारक आहेत. अल्पभूधारक असल्यामुळे ते आपल्या शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञान, अवजारे, बी-बियाणे, औषधे, जलसिंचन सुविधा इत्यादी सुविधांचा वापर करणे त्यांना शक्य नसते. तसेच जमीन धारणेचा कमी आकार, कर्जबाजारीपणा, कोरडवाहू जमीन, विपणन व्यवस्थेची कमतरता, हवामान बदलाचा परिणाम इत्यादी समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची उत्पन्न पातळी इतर शेतकऱ्यांपेक्षा निम्न पातळीची असते. त्यामुळे बहुसंख्यांनी शेती व्यवसाय करणाऱ्या मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास केल्यानंतर त्यांची सामाजिक परिस्थिती आर्थिक परिस्थिती व सोबतच शैक्षणिक परिस्थितीचे निराकरण करता येते. म्हणून प्रस्तुत विषय **"मराठा समाजातील अल्पभूधारक शेतक-यांचे सामाजिक व आर्थिक अध्ययन : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा"** (२००९-१० ते २०१९-२०) या विषयाची संशोधन कार्यासाठी निवड केलेली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१) मराठा समाजातील शेतकऱ्यांच्या भूधारण रचनेचा (पद्धतीचा) अभ्यास करणे.

२) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील शेतकऱ्यांच्या अल्पभूधारकतेच्या कारणांचा आढावा घेणे.

३) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांचे धारणक्षेत्र व जमिनीची उत्पादकता यांचा अभ्यास करणे.

४) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना मिळालेल्या शासकीय योजनांचा अभ्यास करणे.

५) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती अभ्यासणे.

६) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीच्या परिणामाचे अध्ययन करणे.

७) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी उपाय सुचवणे.

संशोधनाची गृहितके :

१) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजामधील अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या ही मोठी दिसून येते.
२) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांचे अवलंबित्व हे शेती व्यवसायावर निर्भर आहे.
३) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची सामाजिक-आर्थिक परीस्थिती ही हलाकीची आहे.
४) नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील शेतकऱ्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती मंदगतीने सुधारत आहे.

संशोधन आराखडा :

व्यक्तीला आपल्या दैनंदिन जीवनात एखादे हाती घेतलेले कार्य व्यवस्थितपणे पार पाडायचे असेल तर त्या व्यक्तीला त्या कार्याचा आराखडा तयार करावा लागतो. या आराखड्यामुळे पैसा, वेळ व शक्ती योग्य प्रमाणात वापरल्या जातात. त्यामुळे संशोधन करीत असताना ते चिकित्सक व वस्तुनिष्ठ पद्धतीने होण्यासाठी संशोधन आराखडा हा महत्त्वाचा टप्पा असतो. एखादी व्यक्ती, समाज, घटना इत्यादी बाबत वास्तविक तथ्यांचे, वैशिष्ट्याचे सविस्तर विवेचन करणे हा वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा मुख्य व प्रमुख उद्देश असतो. वस्तुनिष्ठपणे, विश्वसनीय आणि संतुलित दृष्टिकोन ठेवून संशोधन करणे हे वर्णनात्मक संशोधनात अभिप्रेत आहे. संकलित केलेल्या तथ्यांच्या आधारे वर्णन व विश्लेषण करणे म्हणजे वर्णनात्मक संशोधन आराखडा होय. नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची पार्श्वभूमी, आर्थिक व सामाजिक स्थिती व त्यांना आलेले शेती विषयक अनुभव व समस्या या विषयी सविस्तर माहितीची रचना करण्यासाठी वर्णनात्मक अध्ययन करणे महत्त्वाचे ठरते. प्रस्तुत संशोधनाचा उद्देश वर्णन करणे हा आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा या पद्धतीचा उपयोग करण्यात येत आहे. वर्णनात्मक संशोधन आराखड्यात त्यांचे संकलन करण्यासाठी वैज्ञानिक तंत्राचा उपयोग करून वस्तुनिष्ठ तथ्य संकलित केली जातात. वर्णनात्मक संशोधन आराखड्यात मुलाखती. प्रश्नावली व निरीक्षण इत्यादी साधनांचा समावेश तथ्य संकलनासाठी केला जातो. म्हणूनच, **“मराठा समाजातील अल्पभूधारक शेतक-यांचे सामाजिक व आर्थिक अध्ययन : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा”** (२००९-१० ते २०१९-२०) या संशोधन विषयांमध्ये वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येत आहे.

तथ्य संकलनाच्या पद्धती :

संशोधन कार्यामध्ये तथ्य संकलन हा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो; कारण संशोधनाच्या शेवटी मांडले जाणारे निष्कर्ष आणि सूचना प्रमुख्यांने संकलित केलेल्या तथ्यावर अवलंबून असतात. त्यामुळे संशोधन कार्यामध्ये तथ्यास अनन्यसाधारण महत्त्व असते. तथ्य संकलनासाठी दोन पद्धतीचा उपयोग केला जातो.

१) **प्राथमिक स्त्रोत :**

संशोधक जेव्हा स्वतः किंवा संशोधन सहाय्यकाद्वारे संशोधन घटकाविषयी थेट माहिती संकलित करतो. म्हणजे थेट प्रतिसादकाकडून माहिती संकलित करतो. तेव्हा त्यास प्राथमिक पद्धती (तथ्य) ते असे म्हणतात. सामान्यत: संशोधक प्रथम प्रयत्नातून किंवा स्वयं अध्ययनातून प्राप्त केलेली ही प्राथमिक तथ्ये असतात. म्हणून प्रस्तुत विषयाच्या संशोधन कार्याची अचूक माहिती मिळवण्यासाठी प्राथमिक पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. प्राथमिक पद्धतीमध्ये प्रश्नावली, मुलाखती व निरीक्षण या साधनाचा वापर माहिती संकलनासाठी करण्यात येईल. नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांकडून प्रश्नावली भरून घेण्यात येईल.

२) **दुय्यम स्त्रोत :**

संशोधक जेव्हा इतर व्यक्ती, संस्था, शासन, उच्चस्तरीय अधिकार-सत्ता, विविध प्रकारचे अहवाल व दस्तऐवज यांमधून तथ्य संकलित करतो. तेव्हा त्यास दुय्यम तथ्य असे म्हटले जाते. म्हणून प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक सामग्री बरोबरच दुय्यम सामग्रीचा वापर करून सामग्रीचे संकलन केले जाईल. यामध्ये प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे, सांख्यिकीय विभागाचा अहवाल, जनगणना अहवाल, विविध संदर्भ ग्रंथ, प्रकाशित-अप्रकाशित प्रबंध, दैनिके, साप्ताहिके, मासिके, कार्यालयीन अहवाल तसेच इंटरनेट वरील संबंधित माहिती इत्यादी साधनांचा प्रस्तुत विषयाच्या संशोधन कार्यामध्ये आधार घेण्यात येईल.

नमुना निवड :

सामाजिक शास्त्रातील संशोधन कार्यामध्ये नमुना निवड हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. सामान्यत: जेव्हा एखाद्या घटकावर शास्त्रीय संशोधन करावयाचे असते. आणि त्यासंबंधीची तथ्ये अधिक असतात तेव्हा संशोधकास सर्व घटकांचे सर्वेक्षण किंवा तपासणी करणे सहज शक्य नसते. किंबहुना सर्व घटक अभ्यासात सहभागी करून घेणे वेळखाऊ व त्रासदायक बाब असते. अशा वेळी नमुना निवड करून एकूण अभ्यास घटकांपैकी काही निवडक

घटकांचा अभ्यास करून योग्य त्या निष्कर्षापर्यंत पोहोचता येते व या निवडक घटकांचा विचार करून संभाव्यता नमुना निवड पद्धती वापरावयाची की गैर संभाव्यता नमुना निवड पद्धती वापरावयाची हे ठरवले जाते.

संभाव्यता नमुना निवड पद्धती- "नमुना निवड पद्धतीमध्ये उपलब्ध समुदायातील प्रत्येक घटकास नमुना म्हणून निवड होण्यासाठी समान संधी दिलेली असल्यास म्हणजे सहेतुकपणे कोणत्याही घटकाची निवड केली जात नसल्यास त्या नमुना निवड पद्धतीस संभाव्यता नमुना निवड पद्धती असे म्हणतात."[४]

गैर संभाव्यता नमुना निवड पद्धती- "गैर संभाव्यता नमुना निवड पध्दतींमध्ये संपूर्ण समूह किंवा लोकसंख्येतील एका विशिष्ट प्रातिनिधिक समूहाची निवड करून अध्ययन केले जाते."

प्रस्तुत विषयाच्या अध्ययनासाठी गैर संभाव्यता नमुना निवड पद्धतीमधील यादृच्छिक नमुना पद्धतीने नांदेड जिल्हयातील १६ तालुक्यात मराठा समाजाचे वास्तव्य दिसून येते. प्रत्येक तालुक्याला समान न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून १६०३ गावांपैकी मराठा समाजातील अधिक लोकसंख्या असणाऱ्या व त्यामधील पुरेशा प्रमाणात अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण उपलब्ध असणाऱ्या प्रत्येक तालुक्यातील ५ गावे अशी एकूण ८० गावांची निवड करण्यात येईल. व प्रत्येक गावातून १० मराठा अल्पभूधारक शेतकरी याप्रमाणे ८०० नमुन्याची निवड माहीती संकलनासाठी करण्यात येईल.

संशोधनाचा कालावधी व मर्यादा :

प्रस्तुत संशोधनामध्ये महाराष्ट्र, मराठवाडा इत्यादींचा संदर्भ येत असला तरी सदरील संशोधन हे नांदेड जिल्हयापूरतेच मर्यादित आहे. विषयाच्या संशोधनासाठी सन. २००९-१० ते २०१९-२० हा अकरा वर्षांचा कालावधी निवडला आहे. हा कालावधी जास्त घेता आला असता पण विश्लेषणाच्या सोयीसाठी व अधिक खर्चिक व वेळ खाऊ बाबीला दुजोरा देत कमी वेळेत अचूक निष्कर्ष प्राप्त करण्यासाठी उपरोक्त कालावधी निवडला आहे. या कालावधीतील नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची संबंधित माहिती आकडेवारीच्या स्वरूपात संकलित केली जाणार आहे. ही माहिती त्यांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक परीस्थितीशी व समस्यांशी संबंधित असेल.

आकडेवारीचे विश्लेषण :

प्रस्तुत विषयाच्या संशोधनातील आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी संशोधनातील उपलब्ध आकडेवारीनुसार गणितीय व सांख्यिकीय साधनाचा वापर करण्यात येईल. उदा.

सरासरी, वृध्दीदर, सहसंबंध, प्रमाप विचलन, मध्यमान, मध्यगा, टी-टेस्ट, एफ टेस्ट, ANOVA टेबल इत्यादी सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी सारणी, तक्ता, आलेखाचाही उपयोग करण्यात येईल.

प्रकरण रचना :

प्रस्तूत शोधप्रबंधाची विभागणी सहा प्रकरणात करण्यात आली आहे. प्रत्येक प्रकरणाची मांडणी ही संशोधन विषयाला अनुसरून करण्यात आलेली असून त्याची प्रकरणनिहाय मांडणी पुढील प्रमाणे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना :-

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाची प्रस्तावना- अध्ययन विषयाची निवड- संशोधन विषयाचे महत्व- संशोधनाची उद्‌दिष्टे- संशोधनाची गृहितके- संशोधन विषयाचा आराखडा- तथ्य संकलनाच्या पध्दती- नमूना निवड- संशोधनाचा कालावधी व मर्यादा- आकडेवारीचे विश्लेषण- मराठा जातीची व्युत्पत्ती- मराठा व महाराष्ट्र या नावात असणारा संबंध- भारताची शेती व्यवस्था- आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचे योगदान- महाराष्ट्रातील शेती व्यवसाय करणा-या प्रमूख जाती- महाराष्ट्र राज्याची कृषी विषयक स्थिती- महाराष्ट्र राज्यातील विविध सामाजिक ,आर्थिक घडामोडी- महाराष्ट्रातील शेती व शेतक-यांच्या समस्या.

प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा :-

प्रस्तुत प्रकरणात विषयाच्या अनुषंगाने संशोधन विषयाशी संबंधित अंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व तसेच विभागीय स्तरावरील साहित्याचे पुनर्विलोकन करण्यात येत आहे.

प्रकरण तिसरे : नांदेड जिल्हयाची भौगोलिक व सामाजिक स्थिती :-

प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्हयाच्या संदर्भात असल्यामुळे नांदेड जिल्हयाची निर्मिती- नांदेड जिल्हयाची ऐतिहासिक ओळख- नांदेड जिल्हा प्रशासकीय व्यवस्था- नांदेड जिल्हयाची प्राकृतिक रचना- नांदेड जिल्हयातील विभाग- नांदेड जिल्हयातील नद्‌या- नांदेड जिल्हयातील हवामान व पर्जन्यमान- नांदेड जिल्हयातील जमीन व पिकरचना- नांदेड जिल्हयातील पशुधन- नांदेड जिल्हयातील विजेचा वापर- नांदेड जिल्हयातील उद्‌योग,वाहतूक व दळणवळण- नांदेड जिल्हयातील रोजगार- नांदेड जिल्हयातील सहकार- नांदेड जिल्हयातील शाळा व महाविद्‌यालये- नांदेड जिल्हयातील नगर परिषदा- नांदेड जिल्हयातील पंचायत समित्या- नांदेड जिल्हयाची लोकसंख्या- नांदेड जिल्हयाची शैक्षणिक स्थिती- नांदेड जिल्हयाची कृषी विषयक स्थिती- नांदेड जिल्हयातील जलसिंचन- नांदेड जिल्हयातील बँका इत्यादी बाबतचा थोडक्यात आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण चौथे : नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकऱ्यांचे सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे अध्ययन :-

प्रस्तुत प्रकरणात नांदेड जिल्ह्यातील मराठा अल्पभूधारक शेतकऱ्यांची कृषिविषयक स्थिती- आर्थिक स्थिती- पाणलोट क्षेत्र विकास- पिकांची उत्पादकता- शेतमालाची साठवणूक- शेतमाल विक्री पद्धत- पशुधन व उत्पादकता- घरांचा आकार व स्वरूप- घरगुती टिकाऊ वस्तूंचे प्रमाण- उत्पन्न व उत्पन्नाचे स्त्रोत- बचत व बचतीचे स्वरूप- शेती जोड व्यवसाय- खर्च प्रवृत्ती- कर्ज व कर्जाचे स्वरूप व स्त्रोत- कुटुंबांचा आकार- नियोजन- विवाह पद्धती- शैक्षणिक स्थिती- धार्मिक स्थिती- आरोग्यविषयक स्थिती- व्यसनाधीनता- वयोवृद्धांची सुरक्षा इत्यादी घटकांचे विवेचन करण्यात येत आहे.

प्रकरण पाचवे : नांदेड जिल्ह्यातील मराठा समाजातील अल्पभूधारक शेतकरी आणि विविध शेतीविषयक शासकीय योजना :-

प्रस्तुत प्रकरणात शेतकऱ्यांसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजना तसेच नांदेड जिल्ह्यातील मराठा अल्पभूधारक शेतकऱ्यांनी लाभ घेतलेल्या विविध शासकीय योजना याबाबत विवेचन केल्या जाणार आहे.

प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी :-

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संशोधनाअंती प्राप्त झालेले निष्कर्ष व त्या अनुषंगाने महत्त्वाच्या शिफारशी केल्या जातील.

कामाची वर्ष निहाय योजना आणि साध्य करावयाची उद्दिष्ट्ये:

प्रस्तुत शोध प्रबंध विषयाची मांडणी व अध्ययन याच बरोबर प्रबंध लेखनाचे काम यासाठी वर्ष निहाय नियोजित आराखडा खालिल प्रमाणे राहील.

१) **प्रथम वर्ष**:
विषयाच्या अनुषंगाने अध्ययन सामग्रीचे संकलन व प्रथम प्रकरणाची रूपरेषा व मांडणी करणे व याच बरोबर तथ्य (Data) संकलन करून संशोधन साहित्याचा आढावा घेण्याचे योजिले आहे.

२) **द्वितीय वर्ष**:
द्वितीय वर्षामध्ये संकलित करण्यात आलेल्या तथ्यांचे अध्ययन करून त्याचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

३) **तृतीय वर्ष**: तृतीय वर्षामध्ये गृहीतकृत्यांची पडताळणी, निष्कर्ष आणि शिफारशी मांडण्यात येणार आहेत. याच बरोबर संपूर्ण प्रकरणाची एकत्र बांधणी करून प्रबंध विद्यापिठास सादर करण्यात येणार आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :

१) दत्त एवं सुंदरम, गौरव दत्त & अश्विनी महाजन (२०१६), भारतीय अर्थव्यवस्था, एस.चन्द प्रकाशन, नवी दिल्ली.

२) डॉ. अनिलकुमार वावरे व विजय कुंभार (२०१५), अर्थशास्त्रातील संशोधन पद्धती, एज्युकेशनल पब्लिकेशन, औरंगाबाद.

३) डॉ. जयप्रकाश मिश्र, कृषी अर्थशास्त्र, साहित्य भवन पब्लिकेशन. आगरा.

४) व्यंकटेश पाटील (२०१४), मराठा आरक्षण भूमिका आणि वास्तव, ज्योतीचंद्र पब्लीकेशन,लातूर.

५) राम जगताप व सुशील धसकटे (२०१६), मराठा समाज वास्तव आणि अपेक्षा, राजहंस प्रकाशन प्रा.लि., पुणे.

६) रंजन कोळंबे (२०१९), भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन, पुणे.

७) अच्युत गोडबोले (२०१९), अनर्थ, मनोविकास प्रकाशन, पुणे.

८) विवेक सौताडेकर, आपला नांदेड जिल्हा, विद्याभारती प्रकाशन, लातूर.

९) डॉ. शशिकांत अन्नदाते व स्वाती अन्नदाते (२०२१), संशोधन पद्धती (नेट-सेट मार्गदर्शक), के. सागर पब्लिकेशन, पुणे.

१०) पुढारी वर्तमान पत्र, नांदेड पुरवणी, ऑगस्ट ७, २०२१.

११) www.shodh.inflibnet.ac.in

१२) Mahadesh.Maharashtra.gov.in

१३) Nanded.gov.in

अभ्यासक

आर.डी.जाधव
एम.ए.,बी.एड.,सेट (अर्थशास्त्र)
मु.सोनाळा पो.निमगांव ता.अर्धापूर जि.नांदेड

संशोधन मार्गदर्शक

प्रा.डॉ.पी.आर.मुठ्ठे
सहयोगी प्राध्यापक आणि विभाग प्रमुख,
पद्व्युत्तर अर्थशास्त्र विभाग आणि
संशोधन केंद्र,यशवंत महाविद्यालय,नांदेड